# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय,
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोननं ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट क्रमांक :- २८९ दिनांक :- १३/१०/२०२१

## चैन स्नॅचिंग करणा-या दोन सराईत गुन्हेगारांना अटक करून ४ गुन्हे उघडकीस-नवघर पोलीसांची कामगिरी

दिनांक ०९/१०/२०२१ रोजी सकाळी ०७:०० वाजताचे सुमारास सौ. मयुरी दशरथ म्हेतर रा. श्रीनाथ भुवन, बी. पी. क्रॉस रोड, भाईंदर पुर्व हया बी. पी. रोडने पायी चालत कामावर जात असतांना एका अनोळखी इसमाने त्यांचे गळयातील ९.५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसुत्र जबरी चोरी करून पळून गेला होता. सदर बाबत फिर्यादी यांनी तक्रार दिलेवरून नवघर पोलीस ठाणे येथे गुरनं ७०२/२०२१ भादंवि कलम ३९२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदरची घटना घडल्यानंतर श्री. अमित काळे, पोलीस उपआयुक्त, परिमंडळ १, श्री शशिकांत भोसले, सहा. पोलीस आयुक्त यांनी घटनास्थळास भेट देवून सदरचा गुन्हा उघडकीस आणण्याबाबत मार्गदर्शन व सुचना दिल्या होत्या. नमुद गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवून व वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली नवघर पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी घटनास्थळाची व परिसराची पाहणी करून तांत्रिक बाबींचा आधार घेवून माहिती प्राप्त केली असता चैन चोरी करणा-या आरोपीसोबत त्याचा अजुन एक साथीदार असल्याचे निष्पन्न झाल्याने गोपनीय माहितगाराचे मार्फतीने संशईतांबाबत माहिती घेवून आरोपी नामे साबीर खोबेरूल मंडल वय २२, रा. इंदिरानगर झोपडपट्टी, भाईंदर पुर्व, जि. ठाणे मुळ रा. पश्चिम बंगाल व त्याचा साथीदार नामे कादर खोबेरुल मंडल वय ३० रा. गणेश चरण बिल्डींग, जय अंबे मंदिराजवळ, खोरगांव भाईंदर पुर्व मुळ रा. पश्चिम बंगाल यांना ताब्यात घेवून विचारपूस केली असता त्यांनी सदरचा गुन्हा केल्याची कबुली दिल्याने त्यांना सदर गुन्हयात अटक करण्यात आली आहे.

पोलीस कोठडी दरम्यान आरोपीतांकडे अधिक कौशल्यपुर्वक विचारपूस केली असता आरोपीतांनी नवघर पोलीस ठाणे कडील खालीलप्रमाणे ४ गुन्हे केल्याची कबुली देवून गुन्हयातील चोरी केलेला मुद्देमाल काढून दिला आहे.

| अ.क्र | नवघर पोलीस ठाणे गुन्हा. रजि. क्र व कलम | हस्तगत मुद्देमाल |
|---|---|---|
| १ | ७०२/२०२१ भादंवि ३९२, ३४ प्रमाणे | ९.२३० ग्रॅम वजनाची सोन्याची लगड |
| २ | ५३९/२०२१ भादंवि ३९२, ३४ प्रमाणे | १५ ग्रॅम वजनाची सोन्याची लगड |
| ३ | ६९४/२०२१ भादंवि ३९२, ३४ प्रमाणे | १५ ग्रॅम वजनाची सोन्याची लगड |
| ४ | ११३/२०२१ भादंवि ४२०, ३४ प्रमाणे | १० ग्रॅम वजनाची सोन्याची लगड |

सदरची कामगिरी श्री. अमित काळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१, डॉ. श्री शशिकांत भोसले, सहा. पोलीस आयुक्त यांचे मार्गदर्शनाखाली नवघर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री मिलींद देसाई, पोनि. प्रकाश मासाळ, सपोनि. योगेश काळे, पोउपनी संदिप ओहळ, पोना रविंद्र भालेराव, पोशि. संदिप जाधव, युनुस गिरगावकर, अमीतकुमार पाटील यांनी केली आहे.

**---ooo---**